<u>बृहन्मुंबई महानगरपालिका</u>

उप आयुक्त (विशेष अभियांत्रिकी )यां**चे कार्यालय**

**प्रस्तावना**

उप आयुक्त(वि.अ.) या कार्यालयाच्या अखत्यारित दोन विभाग कार्यरत आहेत.

1. जल अभियंता
2. प्रमुख अभियंता(पाणी पुरवठा प्रकल्प)

## <u>जल अभियंता</u>

जल अभियंता हे मुंबई शहरासाठी असलेल्या जलप्रणालीचे मुख्य अधिकारी आहेत. जल अभियंता खाते पाण्याच्या स्त्रोतापासून मुंबईकरांपर्यंत पाणी पोहचविणा-या जल प्रणालीतील अथपासून इतिपर्यंतची सर्व व्यवस्था बघते. जल अभियंता खाते मुंबईकरांना शुध्द पिण्यायोग्य व पुरेशा पाण्याचा पुरवठा करते.

## <u>प्रमुख अभियंता (पाणी पुरवठा प्रकल्प)</u>

सन 1970 मध्ये जलस्त्रोतांमध्ये वृध्दी करण्यासाठी पाणी पुरवठा प्रकल्प या विभागाची स्थापना करण्यात आली. नंतर प्रकल्प विभाग असे संबोधण्यात आले तर 1972 पासून या विभागाला पाणी पुरवठा प्रकल्प विभाग असे नाव देण्यात आले.

ह्या विभाग विविध प्रकल्पाचे नियोजन तसेच त्याची अंमलबजावणी करण्याचे काम करतो. मुंबई महानगरपालिकेच्या पाणी पुरवठ्यात वृध्दी करण्यासाठी अनेक प्रकल्पांचे नियोजन या विभागातर्फे करण्यात आले. उदा. मुंबई-1, मुंबई-2,3, मुंबई 3-अ यापैकी मुंबई 1,2,3 पूर्ण झाले असुन मुंबई 3-अ चे काम पूर्णत्वाला येत आहे. पुढील काळातील पाणी पुरवठा वृध्दीसाठी मुंबई-4, मध्य वैतरणा पाणी पुरवठा प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर(सुरु) आहे आणि सन 2014 पर्यंत पूर्ण होण्याची अपेक्षा आहे.

सध्या पाणीपुरवठ्यात वाढ करण्यासाठी गारगाई, पिंजाळ व दमणगंगा हे प्रकल्प प्रगतीपथावर आहेत.